# बोर पिकावर ‘कॉमन रेड फ्लॅश’ अळीची नोंद



**छायाचित्रांद्वारे पीक संरक्षण**

रवींद्र पालकर

## किडीच्या संपूर्ण अवस्थांची ओळख



अंडी अवस्था.



अळी अवस्था (शेवटची इनस्टार).



कोष अवस्था.



प्रौढ (फुलपाखरू) : पंख मिटलेल्या अवस्थेत.



प्रौढ (फुलपाखरू) : पंखांची वरील बाजू.

## सूक्ष्मदर्शकाखालील अळीचे वर्णन



बाजूने दिसणारी अळी.



डोके (Head).



वक्षावरील (Thorax) केसाळ शंक्वाकार उंचवटे.



उदर (Abdomen).

## अळीमुळे होणारे नुकसान



पानावरील नुकसान.



फळावरील नुकसान. (सर्व छायाचित्रे : रवींद्र पालकर)

‘कॉमन रेड फ्लॅश’ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या फुलपाखराची प्रथम शास्त्रीय नोंद जोहान ख्रिश्चन फॅब्रिशियस यांनी १७८७ मध्ये सियाम (सध्याचे थायलंड) येथून केली. त्यांनी या प्रजातीचे शास्त्रीय नाव ‘पॅपिलिओ इआरबस’ असे ठेवले. पुढील वर्गीकरणात्मक अभ्यासानंतर सध्या ही प्रजाती ‘रापाला इआरबस’ या नावाने ओळखली जाते. दक्षिण आशियापासून आग्नेय आशियापर्यंत आढळणाऱ्या या फुलपाखराची अळी बहुभक्षी असून विविध जंगली वनस्पतीवर तिची नोंद आढळते. झिझिफस रुगोसा म्हणजेच तोरण किंवा तोरणी ही खाद्य वनस्पती म्हणूनही शास्त्रीय लेखांमध्ये नोंदवलेली आहे. महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात बोराच्या झाडावर ही अळी पाने आणि फळे खाताना आढळून आली. बोर पिकावरील या अळीच्या खाद्यक्रियेची ठोस नोंद उपलब्ध नसल्याने हे निरीक्षण महत्त्वाचे ठरते. मात्र तिचा महाराष्ट्रभर प्रादुर्भाव असल्याचे सध्या तरी म्हणता येत नाही. बोरावरील तिची यजमान पसंती आणि प्रत्यक्ष नुकसान किती आहे, हे जाणून घेण्यासाठी पुढील अभ्यास आवश्यक आहे. या लेखातून क्षेत्रीय निरीक्षणे आणि प्रयोगशाळेतील संगोपनाच्या आधारे घेतलेल्या छायाचित्रांद्वारे या किडीच्या जीवनचक्रातील विविध अवस्था आणि त्यांची ओळख जाणून घेऊया.

**किडीचे सामान्य नाव :** कॉमन रेड फ्लॅश (Common Red Flash)

**शास्त्रीय नाव :** राापाला इआरबस (*Rapala iarbus*)

**गण (Order) :** लेपिडोप्टेरा (Lepidoptera)

**कुळ (Family) :** लायसिनिडी (Lycaenidae)

**नुकसानकारक अवस्था :** अळी.

## किडीची ओळख

- **अंडी :** मादी पानांवर, देठावर किंवा कोवळ्या फुटव्यांवर एकेकटे अंडे घालते. अंडे सुमारे ०.६ मि.मी. व्यासाचे, हिरवे, चपटे व गोलाकार असते. एका टोकाला गर्भद्वाराचा भाग किंचित खोलगट असतो व पृष्ठभागावर जाळीसारखी सूक्ष्म नक्षी दिसते.
- **अळी :** नवजात अळी फिकट पिवळसर-तपकिरी असून सुमारे १.१ मि.मी. लांब असते. डोके व पहिल्या छातीच्या खंडावर काळ्या रंगाची ढालीसारखी चकती असते, तर शरीरावर तपकिरी पट्टे व सूक्ष्म केस असतात. वाढीबरोबर शरीराचा रंग पिवळसर हिरवा होतो आणि पांढऱ्या कडा असलेल्या तिरक्या पार्श्वरेषा स्पष्ट दिसू लागतात. पुढील अवस्थांमध्ये शरीरावर सूक्ष्म केसांचे झुपके असलेले शंकूच्या आकाराचे उंचवटे दिसतात. पूर्ण वाढ झालेली पाचव्या अवस्थेतील अळी सुमारे १६ मि.मी. लांब असून फिकट हिरव्या रंगाची असते.
- **कोष :** पूर्ण वाढ झालेली अळी कोषावस्थेपूर्वी पानावर रेशमी धाग्यांचा आधारपट्टा व जाळे तयार करते आणि त्याला स्वतःला चिकटवून घेते. कोषाचा रंग लालसर तपकिरी असून त्यावर बारीक काळे ठिपके असतात. त्याची लांबी सुमारे ९.५ ते १२.५ मि.मी. असते.
- **प्रौढ (फुलपाखरू) :** नराच्या पंखांचा वरचा भाग लालसर ते नारिंगी असून, कडांवर गडद तपकिरी रंगाची पट्टी दिसते. मादीचा रंग तुलनेने फिकट तांबूस-तपकिरी असतो. नर आणि मादी दोघांच्याही पंखांचा खालचा भाग फिकट करडा-पिवळसर असून, त्यावर फिकट तपकिरी रेषा व ठिपके दिसतात. पंखविस्तार सुमारे ३२ ते ३७ मि.मी. असतो. मागील पंखावर केशरी कड असलेला काळा ठिपका, त्याजवळ निळसर खवले आणि पांढऱ्या टोकाचे शेपूट ही प्रमुख ओळखचिन्हे आहेत.

## जीवनक्रम

अंड्यातून ३ ते ४ दिवसांत अळी बाहेर येते. अळीच्या पाचही अवस्थांचा मिळून कालावधी १८ ते २५ दिवसांचा असतो. त्यानंतर एक दिवसाची पूर्वकोष अवस्था येते, तर कोष अवस्था ८ ते ९ दिवसांची असते. प्रौढ अवस्थेचा कालावधी उपलब्ध साहित्यात स्पष्ट नाही. हा जीवनक्रम इतर यजमान वनस्पतींवर नोंदवला गेला असून बोरावरील संपूर्ण जीवनक्रमाची नोंद अद्याप उपलब्ध नाही.

## अळी नुकसान कशी करते?

अळी यजमान वनस्पतीची कोवळी पाने, कळ्या, फुले आणि पक्व फळे खाते. त्यामुळे कोवळ्या पानांवर कुरतडल्याच्या खुणा, कळ्या व फुलांचे नुकसान आणि फळांच्या पृष्ठभागावर खाल्ल्यामुळे पडलेले खोलगट खड्डे दिसून येतात. परिणामी अकाली फळगळ होण्याची शक्यता असते.

**नियंत्रणाविषयी :** बोर पिकावर ही अळी नव्याने आढळून आली असून, तिच्या प्रभावी व्यवस्थापनाबाबत अद्याप पुरेसे संशोधन उपलब्ध नाही. त्यामुळे सध्या विशिष्ट नियंत्रण उपायांची शिफारस करता येत नाही.

- रवींद्र पालकर,
८८८८४०६५२२
(पीएच. डी. स्कॉलर, कीटकशास्त्र विभाग,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)